# शिक्षणाचा खेळखंडोबा

प्राथमिक शिक्षण हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. एखाद्या उंच इमारतीचा पाया घालताना आपण तो मजबूत होण्यासाठी किती काळजी घेतो ? कारण आपल्याला माहिती आहे, पाया जर मजबूत असेल तर यावर कितीही मजले आपण चढवू शकतो. तेथे आपण प्रयोग नाही करत बसत !!! मानवी जीवन हि तर जगातील सर्वात उंच आणि सुरेख इमारत. मग हिचा पाया घालताना किती काळजी घ्यायला हवी ? सिमेंटच्या इमारतीचा पाया निकृष्ट झाला तर फार तर ती इमारत कोसळेल, पैसा बरबाद होईल. पण जीवनाचा पाया जर कमकुवत झाला तर...???

आणि हाच प्राथमिक शिक्षणाचा पाया सर्व शिक्षा अभियान आल्यापासून प्रयोगामागून प्रयोग करू करू पार खिळखिळा करून टाकलाय. प्रयोग शाळेत डिसेक्शन साठी उंदीर, झुरळे, बेडूक वापरले जातात. अगदी त्यांची होते तीच अवस्था. कधी सरकारी धोरण, कधी शिक्षण मंत्री, त्यांचे सचिव, विभागीय आयुक्त, अनेक जिल्ह्यांचे तथाकथित “उपक्रमशील” सीईओ या सर्वांनी प्रयोग करू करू या बाल जीवांचा पार “उंदीर” करून टाकलाय. कोणीही उठावे आणि “प्राथमिक शिक्षणाचे काही खरे नाही हो....” अशी हाळी दिली की, आपले “एयर कंडीशन्ड” सचिव मंडळींनी नवीन अत्याधुनिक हत्यारांसह (नवीन छपाई) ऑपरेशन (प्रकल्प) केलेच म्हणून समजा. मग या ऑपरेशन ची आवश्यकता असो वा नसो. काही घेणे देणे नाही. शिक्षण या हेडखाली पैसा आहे ना ? मग होऊद्या खर्च...!! नेमका काय आजार आहे ? जखम कशाची आहे ? त्यावर नेमका उपाय कोणता ? खरेच या उपचाराची गरज आहे का ? हा आजार झालाच का ? याला नक्की जबाबदार कोण ? याचा विचार करायला ना शिक्षण खात्यातल्या कोणाला वेळ, ना पालकांना, ना चर्चेच्या फैरी झाडणाऱ्या बोलघेवड्या विचारवंतांना, ना टीआरपी धारकांना...!!

विषय आहे ढासळत जाणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेचा. सन १९९५ पर्यंत गुरुजींना महिन्यातून एकदा फक्त मासिक पत्रक द्यावे लागे. बाकीचा पूर्ण वेळ फक्त अध्ययन अध्यापन. गुरुजी सतत विद्यार्थ्यांसमोर असायचे. शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रिया व्हायची. शालेय शिक्षणाबरोबरच जीवन शिक्षण मिळायचे. आज देशाची जगात मान उंचावणारी, जगभर तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर असणारी आणि शारीरिकदृष्ट्या-मानसिकदृष्ट्या कणखर असणारी ३० ते ४० वयोगटातील पिढी पाहतोय ती याच गुरुजींनी घडवली.

१९९५ ला “केंद्रप्रमुख” नावाचा पोस्टमन तयार झाला आणि त्याच्यासोबत माहितीचे जंजाळ आले. मग प्रशासनाला या पोस्टमनला काय काम द्यायचे याची चिंता लागली. यांना काम

द्यायचे म्हणजे गुरुजीला द्यायचे. मग कागदी घोडे नाचवायला सुरुवात झाली. टिळक पुण्यतिथी-जयंती, गांधी जयंती, स्वच्छता मोहीम, लेखन-वाचन, चावडी वाचन, परिपाठ, प्रत्येक अधिकाऱ्याची स्वतंत्र परिक्षा, अमुक तमुक दिन, इत्यादी...इत्यादी. या शाळा प्रत्यक्ष राबवीत असणाऱ्या बाबी... पण राबविण्यापेक्षा ती दाखविण्यासाठी कागद, फोटो, मिटिंग...म्हणजे निव्वळ चमकोगिरी. काही करू नका... कागद दिला का पोस्टमन कडे ? परिपाठ घेतला- द्या कागदावर लिहून, मुलांनी हात धुतला- द्या कागदावर लिहून, मुलांनी भात खाल्ला- द्या कागदावर लिहून, मुले मनसोक्त मैदानावर खेळतात- द्या कागदावर लिहून, मुले शौचालयाचा वापर करतात- द्या कागदावर लिहून, परिसर स्वच्छ केलाय- द्या कागदावर लिहून, मुलांना कला कार्यानुभव खेळ शिकवलाय- द्या कागदावर लिहून.. किती कागद ? किती कागद ??

इ.स.पूर्व ५००० साली किती पट होता? मुले किती? मुली किती? अनु.जाती, अनु.जमाती, ओबीसी, भविज, ओपन, अल्पसंख्यांक किती? त्यावेळी किती जण शौचास जात? किती जण साबणाने हात धूत? त्यावेळी ८० % हजर असणारे किती? किती जणांना गणवेश मिळाला होता? किती जण शिजवलेला तांदूळ खायचे? किती जण न शिजवता खायचे? पैकी शिजवलेल्या तांदळात ३० फेब्रुवारी इ.स.पूर्व ५००० या दिवशी किती मिलीग्राम हळद टाकली होती? तो आहार शिजवताना स्वयंपाकी महिलेची त्या दिवशीची मानसिक शारीरिक आरोग्याची स्थिती कशी होती? या सर्व बाबींचा विहित नमुन्यातील अहवाल तात्काळ ७ दिवसाच्या आत सादर करावा. यासाठी राज्य स्तरावर तज्ञांचे १ दिवस चर्चासत्र, जिल्हा स्तरावर तज्ञांचे २ दिवस प्रशिक्षण, तालुका स्तरावर मुख्याध्यापकांचे ३ दिवस प्रशिक्षण, आणि १ दिवस माहिती शोधून, लिहून, पालक सभा, ग्राम शिक्षण समिती, माता पालक समिती, शालेय पोषण आहार समिती, शाळा व्यवस्थापन समिती या सर्व कमिट्यांच्या बैठका घेऊन त्यात अहवाल मंजूर करून घ्यावा व केंद्रप्रमुखांकडे ५ वाजे पर्यंत जमा करावा. केंद्रप्रमुखांनी माहिती सायं.५.३० वाजता तालुक्यात सादर करावी. बीईओ ने ही माहिती तत्काळ e-mail द्वारे ६ वाजे पर्यंत जि.प. ला पाठवावी. या वर राज्य स्तरावर ५-५ आमदारांची ३० भरारी पथके; जिल्हा स्तरावर ५ जि.प सदस्य, २ विस्तार अधिकारी, ३ क्लार्क, ३ ग्रामसेवक, ४ तलाठी, ५ शिपाई या प्रमाणे १४ पथके, याच प्रमाणे पं.स.स्तरावर पथके स्थापन करून आदेशानुसार काम होते की नाही यावर काटेकोर नियंत्रण ठेवावे. हलगर्जी करणाऱ्या शिक्षकास ताबडतोब, तत्काळ, जागच्या जागी, क्षणभरही वेळ न घालवता निलंबित करून कार्यमुक्त करण्याचे अधिकार या कमिट्यांना असतील.......

आश्चर्य वाटले असेल सर्वांना हे वाचून. अतिशोक्ती झाली असेल, पण शिक्षणाचे पवित्र कार्य सोडून तुघलकी कामे करण्यात सर्व वेळ खर्च होतोय याचे कोणाला सोयरसुतक आहे का ??? असे असंख्य आदेश, त्याच त्याच बिनकामाच्या माहित्या, गरज नसताना असंख्य मिटिंग,

वर्षभर प्रशिक्षणे तरी किती असावीत? हाता-पायांची बोटे एकत्र करून मोजली तरी बोटे पुरणार नाहीत. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च आला की प्रशिक्षणांची मांदियाळीच...!!! अहो काय करणार ? निधी खर्ची टाकायचा असतो ना?

महिन्यातील सरासरी कामकाजाचे २३ दिवस. मिटिंगचे किमान २ दिवस, मिटींगची माहिती तयार करायला २ दिवस, प्रशिक्षण किमान २ दिवस, काही तरी कार्यक्रमानिमित्त मुले घेऊन उपस्थिती १ दिवस, शाळा पातळीवर विविध समित्यांच्या किमान मिटिंग २ दिवस, रोज एक तास गृहीत धरून शा.पो.आ. साठी ३ दिवस, राज्य-जि.प.-आयुक्त यांच्या स्वतंत्र चाचण्या, उपक्रम यासाठी २ दिवस, जयंत्या-पुण्यातीथ्या-विशेष दिन हे सर्व सोडले तरी कामकाजासाठी उरले ९ दिवस...!!!

आता या ९ दिवसात नियोजित अभ्यासक्रम संपवायचा... तोही आज कोणीतरी १०-२० लोकांची ३-४ जीपगाड्या भरलेली कमिटी येणार आणि कितीही जीव काढला तरी काही तरी कमी काढून एक न एक दिवस मला निलंबित करणार, माझी वेतनवाढ घालविणार या मानसिकतेत...!!! आणि कायदाही जगावेगळा... अहो आमच्या सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत १० पैकी ७,८,९, गुण म्हणजे डिस्टिंगक्शन च्याही कैक पुढे असला तरी नापास..( गोड शब्द : प्रगतीशील). आणि मग असे नापास झालेले अमुक इतके लाख विद्यार्थी ??? काय करतात गुरुजी ??? असा प्रश्न विचारायला प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया पुढे येणार नाही तर नवलच...!!!

गुरुजीला खरोखर मोकळा श्वास घेऊन शिकवायला किती वेळ दिला हो ? त्याच्याकडे नेमके किती कामे आहेत ? किती टन निरर्थक कागद त्याला वर्षभरात लिहावे लागतात ? आणि खरोखर मानसशास्त्रीयदृष्ट्या किती % मुलांची किती % संपादणूक असायला हवी ? याचा विचार कोण करणार ? कधी करणार ? बोलघेवड्या विचारवंतांनी शिक्षकांवरील दोष काढताना चानेलच्या टीआरपी चा विचार न करता जखम नेमकी कोणती आहे, प्रशासनात काय तृटी आहेत ? याचा सकारात्मकपणे शोध घ्यावा.

सध्या प्राथमिक शिक्षकाला शिकविणे सोडून इतर कामाला गाढवा सारखे जुंपले जाते. येणाऱ्या १०-२० कमिट्यांनाही छापील फॉरमॅट मधील माहिती हवी असते. नेमकी अडचण जाणून घेण्याची ना त्यांची इच्छा ना मानसिकता ...!!! मध्यान्ह भोजन योजनेचा लोगो नाही, जेवताना बसायला बस्कर नाही, हात धुवायला पाणी नाही ही काय निलंबनाची कारणे झाली ? शैक्षणिक गुणवत्ता आणि याचा काय संबंध ? तीच गोष्ट BLO ची. “बूथ लेवल ऑफिसर ...!!!” सुंदर

नाव. महसूल विभागातील कर्मचाऱ्याच्या मनात जो येईल तो BLO. भले मग बुथच्या ठिकाणी १० कर्मचारी असू द्या, ते रोज संपर्कात. मग बळीचा बकरा २-३ किमीवर काम करणारा एखादा शिक्षक. त्याने दोन-दोन वर्ग सांभाळून, गुणवत्ता सांभाळून, शाळेत एकावेळी २-४ प्रकल्प राबवून, पुन्हा बूथ वर जाऊन "ऑफिसरकी" करायची. वरून महसूलच्या जेव्हा मनात येईल तेव्हा तहसील मध्ये मिटिंग. नाहीतर लगेच शिस्तभंग होणार. शिक्षक महसुलचा कर्मचारी की शिक्षण खात्याचा की ग्रामविकास खात्याचा ? हे कोडे उलगडण्याजोगे नाही. हवे तेव्हा महसूल विभागाने शिक्षकांना राबवून घ्यायचे. अडचणीच्या वेळी महसूल चा एखादा कर्मचारी शाळेत शिकवायला आला का कधी ? त्याने स्वतःच्या ऑफीस मधील काम तरी कधी वेळेवर केल्याचा अनुभव आहे कोणाला ? जनगणना व प्रत्यक्ष निवडणुकीचे काम सोडता कोणतेही काम सक्तीचे नसताना हा काय प्रकार ? BLO पेक्षा वेठबिगार सालाचा गडी सुखी...!!! मानधन चार आणे आणि येण्याजाण्याचा खर्च रुपया. तो ही त्यांचे भागल्यावर उरतील तेव्हा...!!!

## शिक्षकांची अवांतर कामे :

१) शालेय पोषण आहार देखरेख, हजेरी पटानुसार साहित्य मायक्रोग्राम-मिलीग्राम मध्ये मोजून देणे, साठ्याच्या नोंदी दररोज करणे, चव रजिस्टर, नमुना ठेवणे, बसण्यासाठी चटया टाकणे, उभे राहून मुलांचे हाथ धुवून घेणे, उरलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट लावणे, स्वच्छता ठेवणे, इ.  स्वयंपाकी महिलेला मानधन ३३ रुपये रोज. करेल का एवढ्या कमी पैशात कोणी ही सर्व कामे ? सर्व करावे लागते शिक्षकालाच...!!!

२) परिसर स्वच्छता, शौचालय स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची स्वच्छता.

३) गावाचा वर्षातून २ वेळा सर्वे.

४) वेगवेगळे दिन व सप्ताह साजरे करणे, सर्वच अहवाल तात्काळ देणे.

५) जनगणना, इलेक्शन ड्युटी, BLO, उद्याच्या काळात प्रसंगी महसुलचे जमिनीची नोंदणी, पिक पाहणी, उतारे बनविणे, रेशन कार्ड वाटप, पिकांचे पंचनामे ही कामेसुद्धा भविष्यात करण्याची तयारी ठेवा. कारण त्यांना फक्त एक आदेशच काढायचाय.

६) प्रत्येक येणाऱ्या अधिकाऱ्याचे विशेष प्रकल्प स्वतंत्रपणे राबविणे.

७) शाळाबाह्य मुले शोधण्यासाठी वीटभट्ट्या, उसाची शेते, गुऱ्हाळे, यांच्या शोधासाठी भटकंती करणे. पालकाने मुलाला शाळेतच पाठवावे यासाठी पालकांना काहीच बंधन नाही. दररोज शाळेत येऊन गुरुजी येण्याची चातका प्रमाणे वाट पाहणारी चिमणी पाखरे सोडून न येणाऱ्यांच्या शोधात हिंडणे. पालकांनी मुलाचे शैक्षणिक नुकसान केले म्हणून त्याच्यावर काहीच जबाबदारी, कारवाई नाही.

८) सांस्कृतिक स्पर्धा, बाल आनंद मेळावे भरविणे.

९) शाळा व्यवस्थापन समिती, शालेय पोषण आहार समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, शालेय परिवहन समिती, पालक सभा, यांच्या दरमहा सभा घेणे त्यांची प्रोसिडिंग लिहिणे.

१०) महिन्यातून केंद्रप्रमुखांच्या किमान ३ ते ४ मिटींगला उपस्थित राहणे, दुसऱ्या दिवशी दिवसभर सांगितलेले संदर्भहीन अहवाल लिहून तत्काळ पोहोच करणे

११) महिन्यातून २ ते ३ दिवसांची केवळ निधी खर्च करण्यासाठी आयोजित केलेली प्रशिक्षणे पूर्ण करणे.

१२) आठवड्यातून सरासरी किमान २ ते ३ वेळा तातडीचे, तात्काळ हवे असणारे, अति महत्वाचे, ताबडतोब रिपोर्ट सांगितल्यावर लगेच तात्काळ तयार करून पोहोच करणे.

१३) पालक भेट रजिस्टर ठेवून पालकांच्या विनाकारण भेटी घेत राहणे, कारण रजिस्टर भरले पाहिजे. तपासणीच्या वेळी रजिस्टर मध्ये नोंद नाही याचा अर्थ तुम्ही वर्षभर एकाही पालकाला भेटले नाहीत असा होतो.

१४) दररोज परिपाठ घेतलाच जातो, पण तोही स्वतंत्र रजिस्टर मध्ये लिहून ठेवला तरच तुम्ही घेतला. पण निव्वळ नोंदी करून नाही घेतला तरी चालेल.

१५) दिवंगत मान्यवरांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या प्रत्यक्ष साजऱ्या करण्यापेक्षा साजऱ्या केल्याचा अहवाल तात्काळ देणे.

१६) शाळेची विविध बांधकामे, दुरुस्त्या करण्यासाठी वाळू, विटा, गवंडी, दगड, माती, मुरूम, सिमेंट, इ. मटेरीअल स्वतः शोधणे. कमी पडणारा पैसा स्वतः घालणे. वरून इंजीनिअर, ऑडीटर, नियंत्रक अधिकारी यांचे " हट्ट " स्वखर्चाने पुरविणे.

एवढा सगळा फापटपसारा उरकून " शालेय गुणवत्ता विकासासाठी " थोडाफार वेळ काढून सर्व मुलांना १०० पैकी १०० % मार्क्स मिळवून पास करणे. ९० % मिळाले तर नापास ( प्रगतीशील). त्याच्यासाठी आणखी एक तास ज्यादा कोठून मिळेल हे दुर्बीण घेऊन शोधणे. आता एक शिक्षक मिटींगा, महसुली कामे व तत्सम तातडीच्या कामासाठी सतत बाहेर राहत असल्याने सहकाऱ्याने ४-४ वर्गांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे. कारण एवढी सगळी कामे करून मुख्याध्यापकाचा चेहरा एवढा केविलवाणा झालेला असतो की त्याच्या सहकाऱ्याची तुझ्या वर्गाचे शिकव असे म्हणण्याची हिम्मतच होत नाही.

सामान्य शिक्षक अशा दुष्टचक्रात सापडलेला असताना प्रत्येक शिक्षक संघटना कोणत्यातरी राजकीय पक्ष्याच्या दावणीला बांधलेली. आणि पदाच्या व मानापमानाच्या नाट्यात गुंग झालेली. कधी जागे होणार ? सगळ्या शाळा बंद पडल्यावर ? शिक्षण विभागाचा कारभार नेमका कसा व कोणत्या मार्गाने चाललाय हे संघटनांनी जनतेच्या

प्रकर्षाने लक्षात आणून दिला पाहिजे. कारण ग्रामिण भागातील सामान्य माणसाच्या मुलांबाबतच्या भव्य दिव्य स्वप्नाचा आपण नकळत शासकीय धोरण लकव्यामुळे चुराडा करत आहोत. आजच्या बालकांमध्ये उद्याचे शिवाजी, ज्ञानेश्वर, विवेकानंद वसलेत. पण त्यांचा विकास केला, त्यांना भरपूर वेळ व संधी दिल्या तर...!!!

कधी येईल तो दिवस, जेव्हा मुलाचा गुरुजी १०० % त्याच्या समोरच असेल. आणि गुरुजीचा १००% शालेय वेळ हा फक्त आणि फक्त मुलांसाठीच असेल. शिक्षक संघटनांना आंदोलने करायची असतील तर ती पगारासाठी, वेतनवाढीसाठी, महागाई भत्ता वाढीसाठी नकोत, तर ती हवीत ग्रामिण भागातील चिमण्या पाखरांना त्यांचा हरविलेला गुरुजी मिळण्यासाठी. एक पाऊल टाका या सत्कार्यासाठी , समाजातील लाखो पाऊले तुमच्या सोबत येतील.

- एल. पी. नरसाळे